महाराष्ट्र शासन
गृहविभाग
पोलीस अधीक्षक, कार्यालय, लोहमार्ग, पुणे
सीआयडी ऑफीस कंपाउंड, शिवाजीनगर,संगम ब्रीज जवळ, पुणे ३ ४११००
दुरध्वनी क्रमांक ०२०.- २५५४१५३३
फॅक्स क्रमांक ०२० - २५५४४६३१
ई-मेल - sp.railways.pune@mahapolice.gov.in

जा.क्र.आस्था-१/पदोन्नती/ग्रेड-पीएसआय/सुआप्रयो/२०२४ 4486 पुणे दि. 1 JUL 2024 /०७/२०२४

विषय – सहायक पोलीस उपनिरीक्षकांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade PSI) संबोधण्याबाबत...

संदर्भ – १) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शा.नि.क्र.पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ब, दिनांक.२५/०२/२०२२
२) सुकाणू समितीचे दिनांक.१४/०३/२०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
३) अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/६/पदोन्नती/ग्रेड-पीएसआय/३४/२०२२, दिनांक.२८/०३/२०२२ रोजीचे पत्र
४) अध्यक्ष सुकाणू समिती तथा अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/६/पदोन्नती/ग्रेड-पीएसआय/३४/२०२२ दिनांक.२२/०४/२०२२ रोजीचे पत्र

- - - - - - -

आदेश-

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शा.नि.क्र.पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ब, दिनांक.२५/०२/२०२२ अन्वये, पोलीस नाईक हा मृत संवर्ग घोषित करुन सदर संवर्गातील पदे पोलीस शिपाई, पोलीस हवालदार व सहायक पोलीस उपनिरीक्षक संवर्गामध्ये वर्ग करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयामधील सूचना / आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस महासंचालक यांनी त्यांच्या स्तरावर सुकाणू समिती गठित करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

२. सदर शासन निर्णयातील सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णयानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक.०८/०३/२०२२ अन्वये सुकाणू समिती स्थापन केली. सदर समितीच्या दिनांक.१४/०३/२०२२, दि.०५/०३/२०२२ व व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे दिनांक.११/०४/२०२२ रोजी राज्यांतर्गत घटक प्रमुख यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार संदर्भ क्र.३ व ४ कडील पत्रान्वये सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संबोधण्याची कार्यवाही करणेकामी खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

१) पोलीस दलामध्ये एकूण ३० वर्षे सेवा पूर्ण.
२) सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदवर किमान ०३ वर्षे सेवा पूर्ण.
३) पोलीस उपनिरीक्षक संवर्ग पदाची वेतन घेत असलेले (म्हणजेच जे सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे मूळ वेतन हे पोलीस उपनिरीक्षक वेतन स्तर एस-१४ मधील प्रारंभिक वेतन रु.३६८००/- पेक्षा जास्त आहे.)

३. वरीलप्रमाणे, गृहविभाग, शासन निर्णय क्र.पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ब, दि.२५/०२/२०२२ मधील निर्देशानुसार व अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.पोमसं/ ६/पदोन्नती/ग्रेड-पीएसआय/३४/२०२२, दिनांक २८/०३/२०२२ मधील विहित अटींच्या अधीन राहून, या आस्थापनेवरील जे सहायक पोलीस उपनिरीक्षक विहित निकष पूर्ण करीत आहेत. त्यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade PSI) संबोधण्याकरिता पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे पोलीस आस्थापना मंडळाची दिनांक.२६/०६/२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार खालील नमूद पोलीस अंमलदार यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संबोधण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

४. तरी या आस्थापनेवरील खालील नमूद सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार या आदेशाच्या दिनांकापासून श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade PSI) संबोधण्यात येत आहे.

| अ. क्र. | सहायक पोलीस उप निरीक्षक यांचे नाव | नेमणूक |
|---|---|---|
| १. | सपोफौ/ राजेंद्र बसवंत पिरगनवार | लोहमार्ग पोलीस मुख्यालय, खडकी, पुणे |

| | | |
|---|---|---|
| २. | सपोफौ/सॅमसन डॅनिअल गायकवाड | पुणे लोह.पो.ठा. |
| ३. | सपोफौ/सुरेश श्रीरंग जाधव | पुणे लोह.पो.ठा. |
| ४. | मसपोफौ/पुष्पा युवराज सोनवणे | मानवी संसाधन शाखा, लोह.पुणे |
| ५. | सपोफौ/सुरेश शंकर शिंदे | कोर्ट पैरवी, लोहमार्ग, पुणे |
| ६. | सपोफौ/मोहन शंकर गिरंजे | सुरक्षा शाखा, लोह.पुणे |
| ७. | सपोफौ/राजेंद्र निवृत्ती कांबळे | लोहमार्ग पोलीस मुख्यालय, खडकी, पुणे |
| ८. | सपोफौ/शिवाजी बळवंत पवार | नियंत्रण कक्ष, लोह.पुणे |
| ९. | सपोफौ/दिपक उत्तमराव काळे | लोहमार्ग पोलीस मुख्यालय, खडकी, पुणे |
| १०. | सपोफौ/धनंजय यादवराव खटाटे | वाहतुक शाखा, पुणे लोह. |
| ११. | सपोफौ/चंद्रकांत रत्नाकर साबळे | लोहमार्ग पोलीस मुख्यालय, खडकी, पुणे |
| १२. | सपोफौ/भिमा भाऊ हगवणे | पुणे लोहमार्ग पो.ठा. |
| १३. | सपोफौ/चंद्रकांत दिगंबर पांडे | पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) कार्यालय |
| १४. | सपोफौ/अनिल गुलाबराव टेकवडे | लोहमार्ग पोलीस मुख्यालय, खडकी, पुणे |
| १५. | सपोफौ/जितेंद्र सुधाकर पाठक | उपविभागीय पोलीस अधिकारी, सोलापूर विभाग लोह |
| १६. | सपोफौ/संजय भाऊसाहेब तोडमल | पुणे लोहमार्ग, पो.ठा. |
| १७. | सपोफौ/अशोक धन्नु राठोड | वाहतुक शाखा, पुणे लोह. |
| १८. | सपोफौ/हनुमंत पांडुरंग ठोंबरे | वाहतुक शाखा, पुणे लोह. |
| १९. | सपोफौ/संजय नामदेव जाधव | सोलापूर लोह.पो.ठा |
| २०. | सपोफौ/राजू व्यंकट जाधव | लोहमार्ग पोलीस मुख्यालय, खडकी, पुणे |

५. वरील नमूद श्रेणी पोलीस उपनिरीक्षक यांना नियमित पोलीस उपनिरीक्षक पदोन्नती मिळेपर्यंत सहायक पोलीस उपनिरीक्षकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडतील.

६. उपरोक्त नमूद केलेल्या श्रेणी पोलीस उपनिरीक्षकांपैकी एखाद्या विरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल/निलंबनाची कार्यवाही केली असेल/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल/विभागीय चौकशी अगर शिस्तभंग विषयक कार्यवाही चालू असेल किंवा ते एखादी शिक्षा उपभोगत असेल तर अशा श्रेणी पोलीस उपनिरीक्षकांची सविस्तर माहिती प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

७. श्रेणी पोलीस उपनिरीक्षक म्हणून संबोधन केवळ वैयक्तिकरित्या राहिल व संबंधित सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे सेवानिवृत्तीपर्यंत किंवा ते पोलीस उपनिरीक्षक पदावर नियमित पदोन्नती होईपर्यंत लागू राहील.

८. अध्यक्ष सुकाणू समिती तथा अपर पोलीस महासंचालक, (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/६/पदोन्नती/ग्रेड-पीएसआय/३४/२०२२, दिनांक.२२/०४/२०२२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक यांचा गणवेष पोलीस उपनिरीक्षक यांच्यासारखाच असावा. फक्त त्यामध्ये फित (रिबन) चा फरक असावा. पोलीस उपनिरीक्षकांच्या गणवेषात लाल व निळी फित (रिबन) आहे. श्रेणी पोलीस उपनिरीक्षकांसाठी लाल फित (रिबन) असावी. याबाबतची आवश्यक कार्यवाही करावी.

"श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संबोधण्यात येणाऱ्या सर्व पोलीस अंमलदार यांचे हार्दिक अभिनंदन"

( तुषार दोशी ) भापोसे
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे

प्रति,

प्रभारी अधिकारी, पुणे / सोलापूर, लोहमार्ग पोलीस ठाणे

प्रभारी अधिकारी, मानवी संसाधन शाखा /सुरक्षा शाखा/कोर्ट पैरवी/नियंत्रण कक्ष

रापोनि, लोहमार्ग पोलीस मुख्यालय, खडकी, पुणे

प्रत,

पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), लोहमार्ग पुणे

उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग पुणे /सोलापूर विभाग

प्रमुख लिपीक, लेखा शाखा, लोहमार्ग पुणे

विभागीय चौकशी शाखा / पोलीस राजपत्रक

अधिदान व लेखा अधिकारी, पुणे